चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१७ जुन, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन मुल अंतर्गत फिर्यादी अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस १५/०६/२०१९ रोजी **कु. एस.जे. अंसारी, विशेष न्यायाधीश चंद्रपुर यांनी कारावासाची** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन मुल अंतर्गत मौजा बोरचांदली येथील रहिवासी यातील फिर्यादी अल्पवयीन मुलगी आपल्या घराजवळील दुकानात सामान आणण्याकरीता गेली होती. परत येत असतांना शेजारच्या काकुंनी बोलाविल्यामुळे ते त्यांचा घरी गेली. काकुसोबत बोलचाल करीत असतांना त्यांचा किरायदार यातील आरोपी नामे बापुजी दयाल रामटेके वय ५७ वर्ष रा. बोरचांदली ता. मुल जिल्हा चंद्रपुर हा तिला वाईटनजरेने बघत होता. आणि ती मुलगी तिथुन उठल्यावर आपल्या घरी जात असतांना आरोपीने तिला वाईट इरादयाने  हात लावुन तिचा विनयभंग केला. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मुल येथे अप.क्र. १६/२०१४ कलम ३५४ भादंवि, सहकलम ३,७,८ बा.लै.अं.प्र.कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि. डी. पी. रामटेके, पोलीस स्टेशन मुल यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १५/०६/२०१९ रोजी **आरोपी नामे बापुजी दयाल रामटेके वय ५७ वर्ष रा. बोरचांदली ता. मुल जिल्हा चंद्रपुर यास कलम ३५४ भादंवि मध्ये १ वर्ष शिक्षा व १,०००/—रू, दंड न भरल्यास १ महिन्याची शिक्षा, कलम ७ व ८ पोक्सो मध्ये आरोपीस ३ वर्ष शिक्षा व १०००/—रू दंड न भरल्यास तीन महिने शिक्षा, कु. एस.जे. अंसारी, विशेष न्यायाधीश, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. डी.व्ही. महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. पुष्पगंध बावणे, पोस्टे मुल यांनी काम पाहिले.

———————————————————————————————